Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# अध्यापनशास्त्रातील नवीन प्रवाह : फ्लिप्ड वर्ग

**श्री. परशराम भगिरथ वाघेरे,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**ॲड. व्ही.एच. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.**

**प्रास्ताविक :-**

तंत्रज्ञानाची जसजशी प्रगती होत गेली तसतशी पारंपारिक अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ह्या प्रभावी होत गेल्या. परिणामी कधी तंत्रज्ञानाचा साधन म्हणून तर कधी त्यांच्या सहाय्याने अध्यापनात नवनवीन संकल्पना परिस्थितीनुसार समावेश करण्यात आला. पारंपारिक अध्यापनात नाविन्यता, सर्जनशीलता, उपक्रमशीलता, कृतीयुक्त किंवा सहभागी अध्यापनासाठी तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली. स्थळ, काळ आणि वेळेनुसार अध्यापनात येणाऱ्या अडचणींवर सुध्दा तंत्रज्ञान उपयुक्त ठरु शकते.

विविध प्रयोगशील व्यक्तींच्या प्रयोगातून अध्यापनशास्त्रात अलीकडे संमिश्र अध्ययन, फ्पिड वर्ग, विमर्शी अध्यापन, ऑन लाईन अध्ययन, दूरशिक्षण इ. नवीन प्रवाह आलेले आहेत. त्यापैकी फ्लिप्ड वर्ग या प्रवाहाचा उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**फ्लिप्ड वर्गाची संकल्पना :-**

विद्यार्थ्यांना सक्रिय अध्ययनाच्या माध्यमातून अभ्यासात व्यस्त ठेवण्याची एक संकल्पना आहे. पारंपारिक अध्यापन पद्धती दूर ठेवून विद्यार्थी केंद्रित सक्रिय अध्ययन, चर्चा, समस्या आधारित अध्ययन, गट व समूहचर्चा अशा पद्धतीने वापरणे हे या पद्धतीचा उद्देश आहेत. घटक अध्ययन हे विद्यार्थ्यांना स्वत: समजून घेता येणे हे आवश्यक आहे. तसेच त्यात लवचिकता दाखविता येणे सुध्दा गरजेचे आहे.

**व्याख्या :-**

विद्यार्थी नवीन आशय प्रथम व्हिडीओद्वारे त्यांच्या घरी पाहतो व वर्गात शिक्षकाने दिलेला गृहपाठ शिक्षकाच्या अध्यापनापेक्षा वैयक्तिक मार्गदर्शनाने तसेच विद्यार्थ्यांशी होणाऱ्या आंतरक्रियेतून पूर्ण करण्याच्या वर्गाला फ्लिप्ड वर्ग असे म्हणतात.

फ्लिप्ड वर्ग हे पारंपारिक पद्धतीच्या विरुद्ध दिशेने असून त्या विद्यार्थी वर्गाच्या बाहेरुन प्रामुख्याने वाचन किंवा व्हिडीओ, व्याख्यानाद्वारे प्रथम नवीन साहित्याची माहिती मिळवितो. ते ज्ञान वर्गात समस्या, निराकरण, चर्चा किंवा संवाद यांच्या माध्यमातून तपासणे हे समाविष्ठ आहे.

फ्लिप्ड वर्गाचा प्रमुख हेतू हा विद्यार्थ्याला निष्क्रीयतेकडून सक्रिय अध्यापनाकडे आणणे तसेच विश्लेषण संश्लेषण आणि मूल्यमापन या उच्च दर्जाचया कौशल्यांवर भर देणे हा आहे. वर्गात शिक्षक एकांगी अध्यापन करण्यापेक्षा विद्यार्थी जे ज्ञान इंटरनेटच्या माध्यमातून किंवा वाचनाच्या माध्यमातून प्राप्त करतो. ते वर्गात तपासणे. जसे पूर्वी वर्गात शिकवून गृहपाठ करावा लागे अगदी त्याच्या उलट विद्यार्थी हा पद्धतशीर स्वत: अध्ययन करुन वर्गात शिक्षक त्याला विशेष मार्गदर्शन करुन अध्ययन करण्यास सहत मदत होऊ शकते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या वैचारिक स्तर हा उंचावला जातो.

**फ्लिप्ड वर्गाचे ध्येये :-**

1. विद्यार्थी स्वअध्ययनातून ज्ञान प्राप्त करुन स्वत:चा वैचारिक स्तर उंचावतात.
2. यातून विद्यार्थ्याचे गैरसमज दूर करणे, तसेच सक्रिय अध्ययनात / अभ्यासात विद्यार्थी व्यस्त राहतो.
3. विद्यार्थ्याला या पद्धतीतून ज्ञान ग्रहणास जास्त योग्य वाव मिळतो.
4. विद्यार्थ्यांना त्यांचे ज्ञान विस्तारणे, अर्थ समजणे व ज्ञानाची प्रत्यक्ष पडताळणी करणे याकरिता वाव मिळतो.

**फ्लिप्ड वर्गाचे उद्दिष्ट्ये :-**

1. विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेनुसार योग्य घटक निवडणे.
2. प्रत्येक अध्ययन कर्त्याच्या क्षमतेनुसार अध्ययन साहित्य उपलब्ध करुन देणे.
3. विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य अशी माहिती व सूचना देणे.
4. वर्ग आणि वर्गाबाहेर ज्ञानाशी एकरुप होण्याची संधी विद्यार्थ्यांना देणे.
5. लगेच आणि समांतर प्रतिसादातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची उजळणी घेणे.

वरील उद्दिष्टानुसार विद्यार्थ्यांना वर्गापूर्वीच ज्ञान संपादनाची संधी मिळत असते. त्यानुसार संधीचा फायदा ते आपले अध्ययन चांगले होण्यास मदत होते. तसेच विद्यार्थ्यांना गुणांऐवजी ग्रेड देणे आवश्यक आहे.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान वर्गात अधिक समृध्द / विस्तारीत करण्याची क्रिया वर्गात विकसित होईल यात शंका नाही. वर्गात विद्यार्थी वैयक्तिक किंवा गटाने वर्गाध्यापनापूर्वी आशयविषयी मूलभूत माहिती मिळवितो. मिळविलेल्या ज्ञान व कौशल्यांचा उच्च दर्जाचा विचार प्रक्रियेतून विविध कृती किंवा समस्या सोडविण्यासाठीची जबाबदारी स्वत:वर घेतात.




**फ्लिप्ड वर्गाचे फायदे :-**

1. विद्यार्थी त्याच्या स्वत:च्या गतीने आवश्यकतेनुसार व्हिडीओ, व्याख्याने, त्यातील ठराविक भाग पुन्हा पुन्हा पाहू शकतो म्हणजेच ते स्वत:चे अध्ययन स्वत:च नियंत्रित करतात.
2. सहाध्यायी विद्यार्थ्यांत मागे पडणे वा पुढे जाणे ही काळजी विद्यार्थ्याला राहत नाही.

3. पारंपारिक वर्गाध्यापनात विद्यार्थ्यांना चिंतन, मनन करण्यास वेळ मिळत नाही. काण ते शिक्षकाला अध्यापन करतांना थांबवू शकत नाहीत मात्र फ्लिप्ड वर्गात व्हिडीओ थांबवून त्यांना मनम, चिंतन करता येणे शक्य होते.
4. शिक्षकाला वर्गाध्यापनाच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या विचार प्रक्रियेतील उणीवा दूर करता येणे शक्य होते.
5. पाठ आणि घटक अधिक प्रभावीपणे समजता/ आत्मसात करता येतील.
6. शिक्षकांना एकदा व्हिडीओ तयार केला की, त्याचा पुर्नवापर करता येतो. त्यातून त्याचा वेळ वाचतो. तसेच गैरहजर विद्यार्थ्यांचा विचार करण्याची गरज भासत नाही कारण ऑनलाईनमुळे ते घरी व्याख्याने पाहू शकतात.
7. शाळेला एक व्हिडीओ कॅमेरा व संगणक या व्यतिरिक्त इतर साहित्याची फारशी आवश्यकता नाही, म्हणून फारसे खर्चिक नाही.
8. शिक्षकांना विविध प्रकारचे अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देण्याची सोय करता येते. त्यामुळे विद्यार्थी सक्रिय तसेच त्यांना अध्ययनासाठी प्रोत्साहन करणे शक्य होते.
9. पालकांना सहजपणे ही प्रक्रिया समजते.

**फ्लिप्ड वर्गाच्या मर्यादा :-**

1. फ्लिप्ड वर्गात विद्यार्थी घरी व्हिडीओद्वारे व्याख्यान बघेल. त्यामुळे तो कदाचित वर्गात येणार नाही त्या परिस्थितीत मूळ हेतू साध्य होणार नाही.
2. शाळेची तंत्रज्ञानासाठी आवश्यक साधने उपलब्ध करण्यातील अडचणींमुळे अंमलबजावणीवर परिणाम होईल.
3. प्रत्येक विद्यार्थ्याकडे संगणक व इंटरनेटची सोय असेल हे गृहित धरलेले आहे. मात्र वास्तव परिस्थिती तशी असेलच याची खात्री देता येणार नाही.
4. विद्यार्थी त्याला दिलेल्या व्हिडीओ व्याख्यान तसेच इंटरनेटद्वारे चर्चा करण्यासाठी संगणकावर घरी पुष्कळ वेळ देवून बसेल असे गृहित धरले आहे. मात्र असे घडेल याची शाश्वती देता येणार नाही.
5. चांगल्या प्रकारचे व्हिडीओ व्याख्याने तयार करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानविषयक कौशल्ये प्रत्येक

शिक्षकाकडे असतीलच असे नाही. त्याचप्रमाणे माध्यमिक स्तरावरील सर्वच विद्यार्थ्यांकडे तंत्रज्ञानविषयक कौशल्ये असतील असे नाही. यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता भासेल.

**समारोप :-**

ही पद्धती अधिक प्रसिद्ध होऊ शकते. कारण यात विद्यार्थी स्वत: किंवा कोणत्याही माध्यमातून ज्ञान प्राप्त करुन वर्गात समस्या निराकरणासाठी लागू करुन तपासतात. विद्यार्थी एकमेकांची मदत घेऊ शकतात. तसेच विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी शैक्षणिक साधनांची उपलब्धता होऊ शकते व त्यातून विद्यार्थ्यांचे अधिक / जास्त अध्ययन प्रक्रिया राबविता येणे शक्य आहे.

**सदंर्भ ग्रंथ :-**

1. कुंडेल म.बा. **अध्यापनशास्त्र आणि पद्धती,** सहावी आवृत्ती, पुणे, व्हिन्स प्रकाशन.
2. जगताप ह.ना. **शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने,** नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
3. नागमोती पंकज, देसले सुनिल, **प्रगत अध्यापनशास्त्र,** सात्विक प्रकाशन, नाशिक.
4. Thiyagu K. **New Frontiers in Education,** Vol. 47, No. 1, January-March 2014.